क्रमांक : २७

# <u>महाराष्ट्र विधानसभा</u>

## <u>पत्रक भाग-दोन</u>

### <u>सोमवार, दिनांक ११ मार्च, २०१९/फाल्गुन २०, १९४० (शके)</u>

२७. निदेशानुसार सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणुका-२०१९ ची दिनांक १० मार्च, २०१९ रोजी घोषणा केली आहे. त्यानुसार महाराष्ट्रात दिनांक ११, १८, २३ व २९ एप्रिल, २०१९ या चार दिवशी लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. निवडणुकीची घोषणा केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यात आचारसंहिता लागू केली आहे. आचारसंहितेनुसार निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीत प्रवासाकरिता शासकीय यंत्रणेचा वापर करण्यावर बंधने घातलेली आहेत व ही बंधने विधानमंडळाच्या सदस्यांना देखील लागू आहेत. ही बाब विचारात घेता, मा.पीठासीन अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

- पहिल्या टप्प्याची अधिसूचना प्रसिध्द होण्याच्या दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक १८ मार्च, २०१९ पर्यंत मा.सदस्यांना **<u>केवळ</u>** विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात येणाऱ्या विधानमंडळ समित्यांच्या बैठकीस उपस्थित राहण्याच्या तसेच परतीच्या प्रवासाच्या प्रयोजनाकरिता रेल्वे कूपन पुस्तिकांचा वापर, राज्य मार्ग परिवहन वा अन्य परिवहन सेवांद्वारे मोफत प्रवास व महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ च्या कलम ५ (१-अ) नुसार विमान प्रवास या सुविधा अनुज्ञेय राहतील. अन्य प्रयोजनाकरिता सदर सुविधा अनुज्ञेय राहणार नाहीत.

- तसेच उपरोक्त सुविधा दिनांक १८ मार्च, २०१९ नंतर आचारसंहिता संपेपर्यंतच्या कालावधीत अनुज्ञेय राहणार नाहीत.

विधान भवन,<br>मुंबई,<br>दिनांक : ११ मार्च, २०१९.

**जितेंद्र भोळे,**<br>सचिव (का.)<br>महाराष्ट्र विधानसभा

<u>प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-</u>

(१) महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य<br>(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष<br>(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये